CMYK

सुविचार
यशाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अपयश आणि कठीण परिस्थिती यांची अत्यंत गरज असते.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com


■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 59 ■ गुरूवार, 21 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

# प्रक्रिया गतिमानः जिल्ह्याच्या मतदार यादीतून २ लाख मतदार वगळणार?

## एसआयआर प्रक्रियेला वेग; १ लाख ९३ हजार मतदारांचे मॅपिंग अपूर्ण

### ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार



आरंभ मराठी । धाराशिव

**विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) अंतर्गत जिल्ह्यात मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात मतदार मॅपिंगच्या कामाला वेग आला आहे. दरम्यान, जिल्ह्यात सुमारे १ लाख ९३ हजार ४१ मतदारांचे मॅपिंग विविध कारणाने झालेले नाही. तसेच जिल्ह्यातील दुबार मतदारांचा आकडा देखील ५० हजार इतका असल्याचे समोर आले आहे. मॅपिंग पूर्ण न झालेल्या मतदारांनी पुरावे न दिल्यास जिल्ह्यातील जवळपास दोन लाख नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची शक्यता आहे.**

**मतदार यादीचे मॅपिंग**

| मतदार संघ | मतदार | मॅपिंग झालेले | राहिलेले | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उमरगा | ३१३२२४ | २७७८६८ | ३५३५६ | ८८.७१% |
| तुळजापूर | ३८९७२९ | ३४२५८२ | ४७१४७ | ८७.९% |
| उस्मानाबाद | ३७८७२७ | ३१०७९९ | ६७९२८ | ८२.६% |
| परंडा | ३३५२६३ | २९२६५३ | ४२६१० | ८७.२९% |
| एकूण | १४१६९४३ | १२२३९०२ | १९३०४१ | ८६.३८% |

**मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम**

विशेष सखोल पुनरीक्षणासाठी अर्हता दिनांक - १ ऑक्टोबर २०२६
तयारी प्रशिक्षण व छपाई - २० ते २९ जून
बीएलओ मार्फत घरोघरी भेट - ३० जून ते २९ जुलै
मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण - २९ जुलैपर्यंत
प्रारूप मतदार यादी प्रसिद्धी - ५ ऑगस्ट २०२६
दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी - ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६
दावे व हरकती निकालात काढणे - ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६
अंतिम मतदार यादी प्रसिद्ध - ७ ऑक्टोबर २०२६

धाराशिव जिल्ह्यातील चार विधानसभा क्षेत्रातील १४ लाख १६ हजार ९४३ मतदारांचे विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मॅपिंग केले जात आहे. मृत मतदारांची नावे वगळणे, एका व्यक्तीचे दोन ठिकाणी नाव असल्यास दुरुस्ती करणे, स्थलांतरित मतदारांची नावे कमी करणे, नवीन पात्र मतदारांची नोंदणी, नाव, पत्ता, वय इत्यादीतील चुका दुरुस्त करणे यासाठी एसआयआर प्रक्रिया केली जात आहे. सध्या या कार्यक्रमाची पूर्वतयारी सुरू आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत जुलै महिन्यात घरोघरी भेटी देऊन हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सध्या मॅपिंगचे काम सुरू असून १४ लाख १६ हजार ९४३ मतदारांपैकी १२ लाख २३ हजार ९०२ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. जिल्ह्यात ८६.६८ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. मात्र, १ लाख ९३ हजार ४१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण न झाल्याने या मतदारांचे नाव मतदान यादीतून वगळले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यातील बहुतांश मतदार हे शहरी भागातील आहेत. यामधे ४९ हजार ८७० दुबार मतदार आहेत तर मयत मतदारांचा आकडा ४० हजार असण्याची शक्यता आहे. निवडणूक विभागाकडून २३ हजार ५४१ ब्लर फोटोंची दुरुस्ती करण्यात आली आहे. दुबार नावे असतील तर पुढील नियमानूसार कारवाई होणार आहे. जिल्ह्याची एकूण प्रगती ८६ टक्क्यांहून अधिक आहे. शहरी भागातील मतदारसंघांमध्ये मॅपिंगचे प्रमाण तुलनेने कमी असून कामाची गती वाढविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. मॅपिंगदरम्यान काही मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर आढळून न आल्याचे; तसेच काही मतदार मृत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांमध्ये निवडणूक आयोगाच्या नियमानुसार संबंधित मतदारांना 'स्थलांतरित मतदार' व 'मृत मतदार' या वर्गवारीत समाविष्ट करून नावे वगळण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सन २००२ च्या मतदार यादीशी सध्याच्या मतदारांचे मॅपिंग अनिवार्य आहे. मात्र ज्या मतदारांचे मॅपिंग पूर्ण होणार नाही त्यांना भविष्यात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर सुनावणीला हजर राहावे लागेल. योग्य पुरावे न दिल्यास मतदार यादीतून तब्बल दोन लाख नावे वगळण्याची शक्यता आहे.

# सोन्नेवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### ग्रामस्थांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ उत्साहात



आरंभ मराठी । भूम

भूम तालुक्यातील सोन्नेवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालय आणि समस्त ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या या कार्यक्रमात इयत्ता दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीबरोबरच पालकांचे कष्ट, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि गावाच्या पाठिंब्याचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात NMMS पात्र विद्यार्थ्यांमध्ये अनुष्का प्रविण आनेराव आणि सुहास सतीश कुचेकर यांचा सत्कार करण्यात आला. दहावीमध्ये सिद्धी सतीश सोन्ने यांनी ९१.२० टक्के गुण मिळवत विशेष लक्ष वेधले, तर सार्थ शिवाजी सोन्ने यांनी ९१ टक्के, राजनंदिनी खंडू साठे यांनी ९०.२० टक्के आणि पृथ्वीराज पोपट सोन्ने यांनी ८५.८० टक्के गुण मिळवले. बारावीमध्ये क्षितिज संभाजी सोन्ने यांनी ९५ टक्के गुणांसह गावाचे नाव उज्ज्वल केले. श्रावणी शाहू सोन्ने यांनी ८८ टक्के, आर्यन उद्धव शिंदे यांनी ८६ टक्के आणि अभिजीत विजय साठे यांनी ८४ टक्के गुण मिळवले. तसेच BAMS प्रवेश मिळवलेल्या श्रुती शिवाजी सोन्ने यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रकाश म्हेत्रे, शंकर शिंदे, दस्तगीर पठाण आणि रणजित सोन्ने सर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर यश मिळवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्रेश्वर सोन्ने सर यांनी केले, तर प्रास्ताविक उपसरपंच सतीश सोन्ने यांनी केले. उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, युवक, ज्येष्ठ नागरिक, पालकवर्ग, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आभार राजकुमार सोन्ने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाळू बप्पा सोन्ने, शिवाजी सोन्ने, पोपट सोन्ने, राहुल सोन्ने, विकास सोन्ने, अशोक सोन्ने, सुहास येडे, संदीप सोन्ने, बालाजी सोन्ने आणि सागर सोन्ने यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसमध्ये खांदेपालट; जिल्हाध्यक्षपदी उमेश राजेनिंबाळकर

आरंभ मराठी । धाराशिव



धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी युवा नेते उमेश राजे निंबाळकर यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी वेणु गोपाल यांनी महाराष्ट्रातील जिल्हाध्यक्षांची यादी जाहीर केली असून, त्यामध्ये धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीमध्ये अखेर महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. युवा नेतृत्व, काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते तसेच धाराशिव कृषी उत्पन्न बाजार समितीचे काँग्रेस पक्षाचे एकमेव संचालक उमेश राजे निंबाळकर यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अनेक वर्षांपासून काँग्रेसमध्ये खांदेपालट होत नसल्याने पक्षाला मरगळ आल्याची चर्चा होती. जिल्ह्यात ठाकरे गटाच्या शिवसेनेची ताकद वगळता विरोधी पक्ष कमकुवत असल्याचे चित्र असताना काँग्रेसमध्ये नव्या नेतृत्वाला संधी द्यावी, अशी सर्वसाधारण कार्यकर्त्यांची मागणी होती. अशा परिस्थितीत पक्षाने युवा चेहऱ्यावर विश्वास दाखवत उमेश राजे निंबाळकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे.कोरोना काळात तसेच अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत उमेश राजे निंबाळकर यांनी पूरग्रस्तांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपली होती. जिल्ह्यात काँग्रेस पक्ष मरगळलेल्या अवस्थेत असतानाही पक्ष संघटना जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने भूमिका घेतली होती. गेल्या महिन्यात पक्षाच्या निरीक्षकांनी जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेत सक्षम नेतृत्वाबाबतचा अहवाल पक्षश्रेष्ठींना सादर केला होता. त्यानंतर अखेर उमेश राजे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत व अभिनंदन केले जात आहे.

# जिल्हा कुमार-मुली खो-खो संघासाठी उद्या निवड चाचणी

आरंभ मराठी । धाराशिव



महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या ५२ व्या राज्यस्तरीय कुमार/मुली (१८ वर्षांखालील) अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी धाराशिव जिल्हा संघाच्या प्राथमिक निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी उद्या (शुक्रवार, दि. २२ मे) सायंकाळी ५ वाजता जिल्हा प्रशिक्षण संस्था, धाराशिव (डायट कॉलेज) मैदानावर होणार आहे. राज्यस्तरीय स्पर्धा दि. २ ते ५ जून २०२६ या कालावधीत शासकीय मैदान, नेहरूनगर, विजापूर रोड, सोलापूर येथे पार पडणार आहेत. या स्पर्धेसाठी धाराशिव जिल्ह्यातील कुमार व मुलींच्या संघाची निवड या प्राथमिक चाचणीद्वारे करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंचा जन्म दि. २५ ऑक्टोबर २००८ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. सहभागी खेळाडूंनी जन्म दाखला, दहावीचे हॉलतिकीट अथवा बोर्ड प्रमाणपत्र, आधारकार्ड, शाळेचे ओळखपत्र, पासपोर्ट फोटो आदी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया होणार असल्याने सर्व कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहणार आहे. या निवड चाचणीसाठी निवड समिती सदस्य म्हणून अभिजित पाटील, प्रभाकर काळे आणि सौ. रोहिणी सातपुते (आवारे) हे काम पाहणार आहेत. धाराशिव जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन धाराशिव जिल्हा खो-खो संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

आरंभ मराठी **स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक जाहीर; १८ जूनला मतदान, २२ जूनला निकाल**

# विधान परिषद निवडणुकीत उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण नाही, २९ केंद्रांवर मतदान

आरंभ मराठी । धाराशिव




उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी तीन जिल्ह्यांतील एकूण २९ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार असून या निवडणुकीत उमेदवारांसाठी कोणतीही खर्च मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली. नव्याने मतदारांचा समावेश सुरू असल्याने अंतिम मतदारसंख्या येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. निवडणूक आयोगाने उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची घोषणा केल्यानंतर बुधवारी (दि.२०) जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर तसेच उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिरीष यादव उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुजार यांनी निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती देताना सांगितले की, दिनांक २५ मे रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून असून २ जून रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया १८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार असून २२ जून रोजी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मतमोजणी धाराशिव शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी उस्मानाबाद, लातूर आणि बीड या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण २९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मागील निवडणुकीप्रमाणेच यंदाही तालुका पातळीवर मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्यानुसार धाराशिव जिल्ह्यात ८, लातूर जिल्ह्यात १० तर बीड जिल्ह्यात ११ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदारांच्या पात्रतेबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, लातूर महानगरपालिकेतील सदस्य, धाराशिव आणि लातूर येथील जिल्हा परिषद सदस्य, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील १९ पंचायत समित्यांतील सदस्य तसेच तीनही जिल्ह्यांतील २७ नगर परिषद व नगर पंचायतींमधील नवनिर्वाचित आणि स्वीकृत सदस्य या निवडणुकीत मतदानासाठी पात्र राहणार आहेत.मात्र बीड जिल्हा परिषद, बीड जिल्ह्यातील ११ पंचायत समित्या तसेच बीडमधील २ आणि लातूरमधील १ अशा तीन नगरपंचायतींमध्ये निवडणुका अद्याप झालेल्या नसल्यामुळे त्या ठिकाणचे सदस्य मतदान प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार नाहीत. सध्या या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण १०५१ मतदारांची नोंद असल्याची माहिती प्रशासनाने दिली. मात्र नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश सुरू असल्याने मतदारसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. प्राथमिक मतदार यादी २५ मे रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून अंतिम मतदार यादी १ जून रोजी जाहीर करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, या निवडणुकीत उमेदवारांसाठी कोणतीही खर्च मर्यादा निश्चित करण्यात आलेली नसल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शिरीष यादव यांनी दिली. पत्रकार परिषदेला विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी देखील उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यावेळी केले.

# जिल्ह्यात औषध विक्री ठप्प: धाराशिवमध्ये औषध विक्रेत्यांचा मुक मोर्चा; कठोर उपाययोजनांची मागणी



**धाराशिव** :-अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना (AIOCD) व महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (MSCDA) यांच्या आवाहनानुसार उस्मानाबाद डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुधवारी (दि. २० मे) विविध प्रलंबित व गंभीर प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शांततापूर्ण मुक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन ऑनलाईन औषध विक्री, बनावट औषधांचा वाढता धोका तसेच औषध व्यवसायासमोरील समस्यांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, देशामध्ये ऑनलाईन औषध विक्री, अनियंत्रित डीप डिस्काउंट पद्धती तसेच बनावट आणि संशयास्पद औषधांच्या वाढत्या प्रमाणामुळे पारंपरिक औषध वितरण व्यवस्था व रुग्णांच्या सुरक्षिततेसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. औषध व्यवसाय हा केवळ व्यापार नसून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने प्रशिक्षित फार्मासिस्ट, वैध प्रिस्क्रिप्शन, योग्य साठवणूक व प्रत्यक्ष रुग्ण मार्गदर्शन यांना विशेष महत्त्व असल्याचे संघटनेने नमूद केले. केंद्र शासनाच्या ई-फार्मसी संदर्भातील दिनांक 28 ऑगस्ट 2018 या मसुदा अधिसूचनेबाबत तसेच कोविड काळातील दिनांक 26 मार्च 2020 या अधिसूचनेबाबत औषध विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी संघटनेच्या वतीने शासनाकडे काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भातील अधिसूचना मागे घेणे, कोविड काळातील अधिसूचनेचा पुनर्विचार करून ती रद्द करणे, बनावट व संशयास्पद औषध विक्रीवर कठोर नियंत्रण आणणे, औषध व्यवसायातील अव्यवसायिक डीप डिस्काउंट पद्धतीवर निर्बंध आणणे तसेच रुग्णांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देणारी सक्षम औषध वितरण व्यवस्था कायम ठेवणे आदी मागण्यांचा समावेश होता. सदर निवेदन शासन स्तरावर योग्य त्या ठिकाणी पाठवून औषध विक्रेत्यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, अशी विनंती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

CMYK